**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.23 (   ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत अभियांत्रिकीच्या सी.जी.पी.ए. पॅटर्ननुसार सन 2012-13 मधील प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांचे प्रथम व द्वितीय वर्षाचे मिळून 15 किंवा त्यापेक्षा कमी क्रेडीट बाकी आहेत अशा विद्यार्थ्यांना पुढील वर्षाच्या प्रवेशासाठी पात्र ठरविण्याचा निर्णय विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतला आहे. तसेच बी.फार्मसीच्या अभ्यासक्रमासाठी तृतीय वर्ष प्रवेशासाठी प्रथम व द्वितीय वर्ष मिळून एकूण सहा विषयापर्यंत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाला आणि प्रथम वर्ष उत्तीर्ण, द्वितीय व तृतीय वर्ष मिळून एकूण सहा विषयांपर्यंत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्ष प्रवेशासाठी पात्र ठरविण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.ए.बी.चौधरी यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात ही माहिती देण्यात आली आहे. 21 ऑगस्ट रोजी मंडळाची सभा कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली त्यामध्ये वरील निर्णय घेण्यात आला आहे. या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की, शैक्षणिक वर्ष 2017-18 पासून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सात अभियांत्रिकी महाविद्यालयांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठ,लोणेरे या विद्यापीठाशी संलग्नता घेतलेली असून, 2017-18 मध्ये प्रथम वर्ष (FE) आणि 2018-19 मध्ये द्वितीय वर्षात (SE) डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठ अंतर्गत विद्यार्थी प्रवेशित झालेले आहेत. त्यामुळे शैक्षणिक वर्ष 2018-19 मध्ये TE व BE या वर्गास C.G.P.A. pattern (2012-13) नुसार व शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये BE या वर्गास C.G.P.A. pattern (2012-13) अभ्यासक्रम कबचौउमवि अंतर्गत शिकविले जाणार असून, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत संलग्नित असलेल्या महाविद्यालयात सुध्दा TE व BE चे वर्ग शिकविले जाणार आहेत. तसेच शैक्षणिक वर्ष 2018-19 पासून AICTE च्या नियमाप्रमाणे प्रथम वर्ष (FE) नवीन अभ्यासक्रम लागू करण्यात आलेला असून, शैक्षणिक वर्ष 2018-19 पासून SE वर्गास देखील नवीन अभ्यासक्रम लागू करण्यात आलेला आहे. यामुळे ज्या विद्यार्थ्यांना C.G.P.A. pattern (2012-13) नुसार TE व BE वर्गात विद्यापीठ नियमाप्रमाणे प्रवेश मिळू शकत नाही, अशा विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठ बदल किंवा अभ्यासक्रम बदलामुळे महाविद्यालयात दोन पॅटर्न शिकवावे लागतील.

तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठ, लोणेरे अंतर्गत संलग्नता घेतलेल्या महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठ,लोणेरेअंतर्गत प्रवेश घ्यावा लागेल, किंवा जे महाविद्यालय कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत संलग्नित आहेत, त्यातील विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे प्रवेश घ्यावा लागेल. या सर्व महाविद्यालय/विद्यापीठ प्रशासन व विद्यार्थी यांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता, ATKT ची 15 credit ची अट शिथील न करता व कॅरीऑन न देता अभियांत्रिकी अभ्यासक्रमास C.G.P.A. pattern (2012-13) नुसार प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांचे FE व SE मिळून एकूण 15 किंवा त्यापेक्षा कमी क्रेडीट बाकी आहेत, असे विद्यार्थी TE वर्गास तसेच ज्या विद्यार्थ्यांचे SE व TE मिळून एकूण 15 किंवा त्यापेक्षा कमी क्रेडीट बाकी आहेत, अशा विद्यार्थ्यांना BE वर्गास प्रवेशासाठी पात्र ठरविण्यात आलेले आहेत. ही सवलत C.G.P.A. पॅटर्न (2012-13) नुसार प्रवेशित विद्यार्थ्यांनाच लागू राहील. तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष 2017-18 पॅटर्न किंवा 2018-19 पॅटर्ननुसार प्रवेशित विद्यार्थ्यांना ATKT चे प्रचलित नियम व अभ्यासक्रमात उल्लेख केल्याप्रमाणे लागू राहतील.

तसेच बी.फार्मसी अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष 2017-18 पासून फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (PCI) नुसार अभ्यासक्रम लागू करण्यात आलेला आहे. तत्पूर्वी शैक्षणिक वर्ष 2012-13पासून C.G.P.A.अभ्यासक्रमाचा अवलंब करण्यांत आला होता. त्यानुसार शैक्षणिक वर्ष 2018-19 मध्ये तृतीय वर्ष व चतुर्थ वर्ष हे C.G.P.A. पॅटर्न नुसार शिकविले जाणार आहेत. त्यामुळे जे विद्यार्थी तृतीय वर्ष व चतुर्थ वर्ष प्रवेशासाठी अपात्र राहतील, अशा विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष 2019-20 महाविद्यालयांना दोन्ही पॅटर्न राबविणे महाविद्यालयांना अडचणीचे होणार असल्यामुळे फार्मसी अभ्यासक्रमासाठी तृतीय वर्षास प्रवेशासाठी प्रथम व द्वितीय वर्ष मिळून एकूण सहा विषयांपर्यंत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना तृतीय वर्षास आणि प्रथम वर्ष उत्तीर्ण , द्वितीय व तृतीय वर्ष मिळून एकूण सहा विषयांपर्यंत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षास प्रवेशासाठी पात्र ठरविण्यात आलेले आहेत. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 23 ऑगस्ट, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
जनसंपर्क अधिकारी यांच्या करिता